MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue Oct-2018

# Vidyawarta®

International Multilingual Refereed Research Journal

## 2nd International Conference on

# Dialoguing Borders : Vital Issues in Humanities, Commerce, IT and Management'

6th - 7th October 2018



Chief Editors

Dr.D.N.Ganjewar

Dr.S.K.Sarje

Scanned by CamScanner

70) बाबुराव बागूल यांच्या साहित्यातील स्त्री–पुरुष चित्रण
प्रा.डॉ.रमेश तुकोजीराव देशमुख ||254

71) समकालीन मराठी भाषा, बोली आणि साहित्य
डॉ.कैलास इंगळे ||257

72) स्थानिक स्वशासनात महिला सबलीकरण याची भूमिका
प्रा. डॉ. एम. एफ. राऊतराहे ||260

73) राष्ट्रीयते पुढील आव्हाने आणि उपाययोजना
डॉ. पी. एस. लोखंडे ||263

74) स्थानिक स्वराज्य संस्थेत स्त्री स्थानिक प्रशासनात स्त्रियांची भूमिका व अधिकार (Women Empower...
Raju Nikam, Chalisgaon ||266

75) महिला सबलीकरण आणि कायदे
प्रा. कांतिलाल डी. सोनवणे ||270

76) पंचायतराज आणि महिला सक्षमीकरण
प्रा. सूर्यवंशी व्ही. एम. ||273

77) स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील महिलांचे नेतृत्व (विशेष...
प्रा. मनोज बी. देवकर ||275

78) ब्रिटीशकालीन शिक्षणाचा विकास – एक समाजशास्त्रीय अभ्यास
प्रा. परळकर एस. डी., ||279

79) मराठी नाटकांतील स्त्री–चेतना
डॉ. संदीप अ. बनसोडे ||281

80) स्त्री सबलीकरण : अपेक्षा आणि वास्तव
प्रा. डॉ. फुके व्ही. एल. ||290

81) सामाजिक समता व गांधी विचाराची प्रासंगिकता
प्रा. डि. बी. जाधव ||292

82) दलित साहित्य विमर्श
डॉ. देविदास मल्लप्पा तेलंगे, ||294


www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com



Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
October 2018 Special Issue
0281

संदर्भ ग्रंथ :

१) भारतीय शिक्षाका इतिहास, विकास एवम् समस्यायें : एस.पी.गुप्ता, अल्का गुप्ता.

२) ब्रिटिशकालीन भारताचा इतिहास : डॉ. अनिल कठारे

३) आधुनिक भारत : आचार्य शं.द. जावडेकर

४) भारत मे शैक्षणिक प्रणाली का विकास : डॉ. कविंद्र कुमार

५) भारतीय शिक्षा एक ऐतिहासिक विवेचन : एस.पी.गुप्ता, अल्का गुप्ता.

❑❑❑

79

# मराठी नाटकांतील स्त्री–चेतना

डॉ. संदीप अ. बनसोडे
मराठी विभागप्रमुख,
र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई, बीड

सिग्मंड फ्राईड या मानसशास्त्रीय संशोधकाने मानवी वर्तन आणि मानवी मन या संदर्भात अनेक नवनवीन संशोधन केले. या संशोधनाने मानवी अंतर्मनाचे द्वार मोकळे झाले. फ्राईडच्या संशोधनाचा निष्कर्ष असा की माणसाच्या मनात कामक्षुधा, अन्नक्षुधा अशा अनेक प्रवृत्ती खोलवर रुजलेल्या असतात. सामाजिक बंधने व संस्कार यांनी कितीही काळ त्या दडपल्या जातील पण मानवी मनाला त्या नेहमी पोखरत असतात व कधीतरी त्यांचा उद्रेक होतो. म्हणूनच मानव त्याचे अंतर्मन यांचा नाटकातून विचार होऊ लागला. मानवी अनुभवाच्या अनेक पातळ्या, त्या अनुभवाचे संमिश्र स्वरूप, त्याच्या स्वभावातली विसंगती, त्याचे विघटित मन, त्याच्या वृत्तीमागील अनेकविध शक्ती, बाह्य सृष्टीतील घटनांचे व त्याचे संबंध यांचे दर्शन घडल्याशिवाय मानवी जीवनाचा खरा आशय ध्यानात येणार नाही हे जाणवू लागले, म्हणूनच वृत्तीचे इष्ट अनिष्ट, श्लील अश्लील व मंगल अमंगल संकेत वाङ्मयबाह्य म्हणून झुगारून दिले गेले. स्वप्नरंजन, आदर्शवाद आणि उपदेश यांचा मराठी नाटकावरील प्रभाव कमी झाला. मानवी मनाचे अनेक पापुद्रे, मानवी मनाची प्रवृत्ती आणि विकृती, मानवी अनुभवाची तीव्रता, सखोलता आणि व्यामिश्रता यांचा मराठी नाटकातून विचार होऊ लागला.

मानवी मनात कामक्षुधा आणि अन्नक्षुधा या सातत्याने वास करत असतात हे फ्राईडच्या संशोधनाने तर सिद्ध केलेच परंतु अजून एका वास्तवाचा शोध फ्राईडच्या मानसशास्त्राने लावला तो हा की माणसाच्या



Scanned by CamScanner

भेटले पण हवे आहे. तिची गाठ भाऊराव पटवर्धन या हौशाच्या गायक नटाशी पडते. त्या दोघांची प्रीत जमते. आपल्या 'शर्मिनी' या नाटकासाठी लिहिलेली पदे ती भाऊरावांच्या स्वाधीन करते. ज्याच्या जोरावर ते नाटक सर्वत्र गाजते. पुढे पुस्तकाच्या प्रकाशनानंतर अंजनीच्या असे लक्षात येते की, प्रस्तावनेत तबलापेटीवाल्यांचेही आभार मानले गेले, पण तिचा साधा उल्लेखही त्यात आला नाही. तिचा उल्लेख करून श्रीमंत चंद्रपुरकरांचा आश्रय त्यांना गमवायचा नाही. अंजनीचे मन तुटून जाते. पण इतक्यात भाऊरावांचा मृत्यू होतो. अंजनीला अत्यंत दुःख होते. तिचे सांत्वन करायला प्रथितयश लेखक दादासाहेब सरंजामे यायला लागतात. अंजनी त्यांचा आश्रय घेते. त्यांच्याबरोबर नदिडला जाते. तिला तेथे मिळालेली रखेलीची वागणूक पाहून ती उद्ध्वस्त होते. ती परत येते. दारूच्या व्यसनात बुडते. मंगेश तिला आवरू पाहतो पण त्याला यश येत नाही. त्याच्याच मदतीने ती पंत ठेंग्यासारखा यजमान शोधते. आपल्या दारूच्या व्यसनासह त्यांनी आपला स्वीकार केला यातच समाधान मानून त्यांच्याबरोबर राहू लागते.

'कस्तुरीमृग' मधील 'अंजनी'

अंजनी ही अगदी निरागस, निष्पाप, स्वप्नाळू, उत्कट मनोवृत्तीची उत्साहाने आणि तारूण्याने मुसमुसलेली आहे. आपली प्रतिभा, आपली कला आणि त्या कलेचा विकास हा तिच्या जीवनाचा मुख्य उद्देश आहे. आपल्या जीवनाला आपल्याला हवा तसा आकार देता येईल अशा भ्रमात ती आहे. कुठलेही सुख भरभरून देण्याची आणि घेण्याची तिची वृत्ती आहे. मावशीच्या छत्राखाली सुरक्षित जीवन जगल्यामुळे तिला अजून वास्तवाचे चटके बसलेले नाहीत. वाचनामुळे आणि शिक्षणामुळे तिची प्रतिभा फुलू लागली होती. जसा माणूस बोलतो तसाच तो प्रत्यक्षात असेल असे तिला वाटते. आपल्या भोवतालची परिस्थिती, मावशीचे आयुष्य आणि आपले सामाजिक स्थान याबद्दल अंजनीला कल्पना नव्हती असे नाही. गृहस्थाच्या घरी जन्म घेऊनही फरक पडला नसता. तिथेही रोज घरापासून मसणापर्यंत बटीकपणा करावा लागला असता याची तिला जाणीव आहे. सर्वसाधारण गणिकेचे, लग्न करून संसार करावा व समाजात मानाचे स्थान मिळावे असे स्वप्न असते, परंतु अंजनीचे स्वप्न असे नाही. सदर हिशोबाचा रोखठोक जीवन जगणाऱ्या मावशीला प्रश्न पडला आहे. ''एक एक रे मीशा हिला कलावंतपण नको आणि गरतीचाही जन्म नको, बये, मग तुला हवंय तरी काय ?'' या गहन प्रश्नाचे उत्तर शोधण्यातच तिचे सारे आयुष्य गेलेले आहे. आपल्याला आवडणाऱ्या पुरूषाबरोबर, जो आपल्याला बरोबरीचे स्थान देईल, त्याच्याबरोबरच राहून साहित्याचा आनंद लुटावा असे तिला वाटते, तसेच आपल्यातल्या प्रतिभेचा आदर पुरूषांनी करावा असेही तिचे मत आहे. परंतु पुरूषांच्या नजरेत मात्र तिची किंमत, भोग घ्यायला उपयुक्त असे एक शरीर एवढीच आहे. ग. व. पेडसे यांच्याबरोबर रोजभरणी झाली. तेव्हा तिला तयार होणे भागच पडले. नंतर शरीरावर पडलेले ओरखडे भरून आले. तिचे रंगीबेरंगी स्वप्न पाहण्याचे वेड कमी झाले नाही. तिचा बालपणीचा मित्र मंगेश याने दिलेली ताकीद तिच्या धुंद मनात जाऊन पोचलीच नाही. माझ्या वाट्याला जे आयुष्य येईल ते मी पत्करणार नाही. माझ्या सौंदर्याच्या आणि प्रतिभेच्या जोरावर मी माझे आयुष्य हवे तसे घडवीन अशी जिद्द तिला वाटत होती. अशी आशा निर्माण करणारा स्वप्नीचा राजकुमार तिला भेटला. त्याला तिने तिचे सर्वस्व समर्पण केले. ती दारू प्यायला लागते. स्वर्ग दोन बोटे उरलीत असे वाटत असतानाच तिच्या धुंदफुंद मनावर पहिला आघात होतो तो म्हणजे भाऊरावांना आपल्यापेक्षा व्यवहार जास्त महत्त्वाचा वाटतो हे तिच्या लक्षात येते. ती जमिनीवर आपटली जाते. तिच्या स्वप्नाळू मनाला चटके बसायला लागतात. आपल्या मनस्वी स्वभावामुळे ती भाऊरावांबरोबरचे संबंध तोडून टाकते. त्यांच्या अकाली मृत्यूचे तिला खूप दुःख होते. पुढे दादासाहेब सरंजामे यांच्या स्वभावातली दांभिक आणि भित्री बाजू अंजनीला दिसते. तेव्हा भाऊरावांच्या उमद्या स्वभावाची तिला फार आठवण होते. अंजनीसाठी प्रसंगी त्यांनी कंपनीतल्या लोकांशी भांडण केले होते. सदा सर्वकाळ आपल्याबरोबर मिरवले होते. तिच्या स्त्रीत्वाचा अपमान त्यांनी केला नव्हता. दादासाहेबांनी मात्र तिला नदिडला आणल्यापासून तिचा सतत अपमान केला. त्यांनी

आयुष्य जगू इच्छिणाऱ्या अंजनीचा मळी पिण्यासाठी झगडणाऱ्या अंजनीच्या पदरी निराशाच पडली आहे. असंवेदनाशील समाजात तिची फरफट झाली आहे. तिच्या आयुष्यात आलेल्या पुरुषांच्या आपमतलबी स्वभावामुळेच तिची अशी दुरवस्था झाली हे जरी खरे असले तरी या शोकांतिकेचे मूळ अंजनीच्या स्वभावातही दडले आहे. अंजनीचा उत्कट आणि मनस्वी स्वभाव व तिची मोहवशता या गोष्टीही तिच्या या अवस्थेला कारणीभुत झाल्या आहेत. मागे सांगितल्याप्रमाणे पहिल्या अंकात अंजनीचा दारू न पिण्याचा निश्चय दिसून येतो. दुसऱ्या अंकात भाऊरावांच्या दारू पिण्याच्या व्यसनाबद्दल मंगेश जे म्हणतो ते अंजनीलाही लागु पडते. व्यसने कुणी कुणाला लावू शकत नाही, सिद्धता मुळातच असते. कुणी तरी होतो निमित्त मात्र, अंजनीची ही सिद्धता मुळातच होती. निव्वळ भाऊरावांचा आग्रह म्हणून पिणारी अंजनी व्यसनात जास्तीत जास्त गुरफटली जाते. काही वेळा संयमाचा अभावही दिसून येतो. दादासाहेब रात्रीची वाट पाहात असतात. तेव्हा अंजनी म्हणते, ''अहो राजे पण माझ्यासारखी रातराणी तुमच्या शब्दानेही फुलून येते. त्यासाठी रात्रीची वाट..''[१] अंजनीच्या उतावळ्या स्वभावाचीही कल्पना येते. भाऊरावांनी नाटकाच्या प्रस्तावनेत आपला उल्लेख केला नाही म्हणून तिला खूप राग येतो. ते गेल्यावर दुःखही तेवढेच होते. भाऊरावांचा फोटो नदिडला त्याचवे ती ठरवते पण त्याचवेळी ''भाऊरावांचे नाव सुद्धा काढू नकोस, माझं प्रेम त्यांना कधी कळलेच नाही त्यांना हवं होते फक्त माझे शरीर माझे यौवन'' असा रागही व्यक्त करते. असा क्षणात तोळा तर क्षणात मासा होणाऱ्या तिच्या स्वभावामुळे या दुष्टचक्रात ती अडकत गेली आहे.

'कस्तुरीमृग' या नाटकात शोकात्म भाव निर्माण होण्याचे मुख्य कारण अंजनीचे सुजाण कलावंताचे अस्तित्व ही एक शक्ती आणि त्या सुजाण अस्तित्वाचे उपयुक्त रूपांतर करू इच्छिणारी समाजशक्ती, यातल्या संघर्षातूनच हे नाट्य फुलत गेले आहे. अंजनी आणि मंगेश एका बाजूला तर पेंडसे, भाऊराव, दादासाहेब हे आणि मावशी दुसऱ्या बाजूला असा हा लढा आहे. प्रत्येकाला माणूस म्हणून महत्त्व असावे असा अंजनी मंगेशचा आग्रह आहे तर माणसापेक्षा त्यांच्या सामाजिक स्थानाला आणि आर्थिक सुबत्तेला महत्त्व असावे असा इतरांचा आग्रह आहे. आपल्या मावशीसारखे सुरक्षित आयुष्य अंजनीला घालवता आले असते, पण शिक्षणाने फुलत गेलेली तिची प्रतिभा असे होऊ देत नाही. तिची देवदत्त प्रतिभा, तिचा ज्ञानमार्गावर चालण्याचा ध्यास, आपल्याला बरोबरीचे स्थान देणाऱ्या प्रियकराबरोबरच्या सहजीवनाची आस, आपल्याबद्दल आपल्या प्रियकरांना नक्की काय वाटते हे सत्य समजाऊन घेण्याची तिची तीव्र धडपड यामुळे या शोकात्म भावाची तीव्रता वाढतच जाते. आपले जेवढे सामर्थ्य होते तेवढे प्राणपणाला लावून आपल्या ध्येयासाठी तिने लढा दिला आहे. या आपल्या धडपडीचे विपरीत परिणामही होऊ शकतील असा विचार मनातही न आणता या मृगजळामागे ती वेड्यासारखी धावत सुटली आहे. ज्यावेळी या प्रयत्नाची व्यर्थता तिच्या लक्षात आली त्यावेळी ती पूर्णपणे मोडून पडली आहे. सारे काही उद्ध्वस्त झाल्याचा, सारे काही उजाड झाल्याचा, सर्वस्वाचा सर्वनाश झाल्याचा विदारक अनुभव तिला आला आहे. आता तिलाच तिच्या विनाशाची ओढ लागली आहे. आता व्याकुळतेचा विकलतेचाही अंत झाला आहे. ती पूर्णपणे सुन्न झाली आहे. सुखदुःखाच्या पलीकडे गेली आहे. शरीर आहे म्हणून त्याला पोसणे भाग आहे आणि उद्ध्वस्तता विसरण्यासाठी दारू पिणेही भाग आहे. आपल्या मनातल्या कलावंतपणाला तिने मूठमाती दिली आहे. या आत्मनाशाकडे तिची होणारी वाटचाल प्रेक्षकांनाही सुन्न करून टाकते. या तिच्या विषण्ण आणि विदारक शेवटाकडे बघून प्रेक्षकांच्या मनात अनेक प्रश्न उठतात. उत्तुंग भराऱ्या मारणाऱ्या कोमल मनाचे पंख अमानुष वास्तवाने क्रूरपणे छाटून का टाकावे ? वंचनेच्या शस्त्राने अंजनीचे हृदय वारंवार घायाळ का व्हावे ? ज्या प्रतिभेच्या जोरावर अननुभूत आनंदाची प्राप्ती झाली तीच प्रतिभा तिच्या विनाशाचे कारण का व्हावी ? आपल्या मनाप्रमाणे जगण्याची इच्छा व्यक्तीने बाळगुच नये काय ? जन्म अपघाताने आणि भोग मात्र उघड्या डोळ्यांनी बघावे लागावेत असे का ? आत्मभान येण्याचं स्वातंत्र्य असुच नये काय ? ज्याची जीवनेच्छा



Scanned by CamScanner

आश्वासनानंतर तिला गावाबाहेर असलेल्या डाक बंगल्यावर बोलावतात. अंबिका आपल्या वडिलांबरोबर म्हणजेच अण्णांबरोबर डाकबंगल्यावर जाते पण अण्णांना हाणून हाकलून दिले जाते. पुढे गुलाबराव अंबिकेवर बलात्कार करतो. ओढवलेल्या प्रसंगाने ती खचून न जाता कोर्टात जाऊन न्याय मिळविण्याचा प्रयत्न करते परंतु तिला न्याय मिळत नाही. घडलेल्या गोष्टींचा परिणाम म्हणून अंबिकेची खचलेली आई आत्महत्या करते. तिचा प्रियकर सिद्धार्थही तिला सोडून जातो. तिने मान्य केलेले हक्काचे असणारे पाश तुटले जातात. मग ती मनाशी निश्चय करून थंडा आणि त्याच्या साथीदाराला घेऊन डाक बंगल्यावर गुलाबरावाने बोलवण्याच योजना आखून जाते. गुलाबरावाला तिचा डाव ध्यानी येत नाही आणि ज्या गुलाबरावाने तिच्यावर बलात्कार केला होता त्या गुलाबरावाचे इंद्रिय (लिंग) अंबिका सुरीने छाटून टाकते आणि अगदी शांतपणे खुर्चीवर बसून पोलिसांना फोन करते.

**'पुरुष' मधील 'अंबिका'**

अंबिका ही स्वातंत्र्यसैनिकाची मुलगी आहे. ती व्यवसायाने शिक्षिका असून जीवनात काहीतरी करून दाखवण्याची तिची उमेद आहे. ती कर्तव्यनिष्ठ आहे. तिच्या वडिलांनी बालपणी नक्कीच सामाजिकतेचे बाळकडू तिला पाजले असावे असे वाटते, कारण अंबिका ही एका दलित मुलावर (सिद्धार्थ) प्रेम करते, आणि त्याने आयुष्यभर समाजसेवा करावी, आपण नोकरी करून संसार सांभाळावा असे तिला वाटते. ती अन्यायाचा प्रतिकार करणे जाणते म्हणूनच माळीबाई नामक शिक्षिकेच्या जागेवर जेव्हा गुलाबराव पेट्रोलपंप उभारण्याचे स्वप्न पाहतो तेव्हा मोर्चे काढून, आंदोलने करून त्याचे स्वप्न अंबिका धुळीस मिळविते. गुलाबरावाचे नाक मी मुळापासून कापून टाकते, अगदी काष्टा सुटेपर्यंत तो पळत होता. हे सांगताना तिला अभिमान वाटतो. माया गवई नावाच्या मुलीवर बलात्कार झालेला असतो. या संदर्भात ती आपली भूमिका स्पष्ट करताना अण्णांनी हिंसाचाराने प्रश्न हिंसाचाराने मिटतात का ? अशा विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना म्हणते, "अशा प्रश्नाचे मायाला काय सोयरसुतक ? ती एक स्त्री म्हणून अपमानित झाली. पैशाच्या सत्तेच्या जोरावर तिला अपमानित केली गेली. तिला तर न्याय मिळत नसेल तर तिला बदला घेण्याचा अधिकार नाही का" ? " या तिच्या संवादावरून आपणास तिच्या पुढील कृतींचा अंदाज घेऊ शकतो. ती फटकळ स्वभावाची व पुरुषी वृत्तीची आहे. आक्रमक आहे. शरण न जाणाऱ्या द्रौपदीचा तिला अभिमान आहे. पाच जणांबरोबर शय्यासोबत करणारी द्रौपदी असा जेव्हा गुलाबराव उल्लेख करतो तेव्हा ती त्याच्यावर भयंकर चिडते. स्त्री म्हटल्यावर फक्त तिच्या देहाचाच विचार पुरुषांच्या मनात का येतो ? असा सवाल ती त्याला करते. तिच्या अशा आक्रमक वृत्तीमुळे ती गुलाबरावाला भावते. ही आक्रमक वृत्ती आपण टाचेखाली एक दिवशी रगडू बहुधा अशा अहंकारी इच्छेमुळे गुलाबराव तिच्यावर डाकबंगल्यात बलात्कार करतात. या बलात्कारापूर्वी ती बराच विरोध करते. अण्णा आणि आपण असहाय आहोत याचे भान असूनही ती बलात्कार होऊ नये यासाठी शेवटपर्यंत धडपडते. गुलाबरावाच्या श्रीमुखात एक ठेवूनही देते. यामुळे गुलाबराव चिडून त्याच्या नोकरांकरवी तिचे हातपाय बांधून, ती ओरडू नये म्हणून तिच्या तोंडात गांधी टोपी कोंबून तिच्यावर बलात्कार करतो.

अंबिका झाल्या प्रकारामुळे भांबावते. ती जरी भांबावलेली असली तरी ती शांत बसणाऱ्यातली नसल्याने न्याय मिळावा यासाठी प्रथमतः कोर्टात जाते पण त्याचा काहीही फायदा तिला होत नाही. ती कलेक्टर ऑफीसवर मोर्चा नेते पण कलेक्टर तिला तिथे भेटत नाही. ती गृहमंत्र्याला मदतीची विनंती करते पण त्याच्याही स्त्री देहासाठीच्या वखवखलेल्या नजरा पाहून तिला त्याची किळस येते. अंबिका हे सर्व करते. तेव्हा झाल्या प्रकारावर पडदा पाडून तिने स्वतःची इज्जत वाचवावी असा समज बहुधा तेथील बायकांचा असावा. अंबिका न्याय मिळवण्यासाठी दारोदार भटकते तेव्हा तिथल्या बायकांना वाटते की, तीच तशी असावी. बायकांच्या या तिच्याविषयीच्या प्रतिक्रिया ऐकून ती आश्चर्यचकीत होते. तुमच्या मनाचा उपयोग काय? तुमचे फक्त शरीर उपयोगाचे हे गुलाबरावाचे वाक्य ऐकून तिचा संताप अनावर होतो. सिद्धार्थचा पळपुटेपणा पाहून ती चिडते. तू आता बायको म्हणून नको तर



Scanned by CamScanner

तर तिने केवळ त्याला शारीरिकरित्या जखमी केलेले नाही, तर मानसिकरित्या त्याला जखमी करण्यात ती यशस्वी ठरते. ज्या गुलाबरावांसारख्या लोकांना पैशाचा आणि सत्तेचा माज असतो, ज्या पुरूषत्वाच्या जोरावर ते गावडे माजतात, तो माज उतरविण्यात आणि स्वत: न्याय हिसकावून घेण्यात अंबिका यशस्वी होताना दिसते.

'पुरूष' बद्दल असे म्हणता येईल की, हे नाटक एका संघर्षातीत शेवटपर्यंत चालते. आपल्या स्वभावानुसार रेखाटलेल्या पात्रांनी जी कालक्रमणा व्हायला हवी होती ती होताना दिसत नाही. त्यांच्या स्वाभाविक कालक्रमणेला लेखकाने मोडा घातला आहे. त्यातून लेखक हे आपल्या अनुभूतीशी प्रामाणिक राहिले नाहीत असे प्रकर्षाने जाणवते. लेखकाला समाजातला वास्तव अनुभव ज्ञात असूनही रंजकतेच्या पाठीमागे धावण्याच्या मोहापोटी नाट्य लिखाणाच्या वेळी विसरून गेल्याचे दिसुन येते. नाटकातील पात्रांना स्वाभाविकपणे जगू देण्याऐवजी त्यांच्यावर वर्चस्व गाजवताना ते दिसतात. या वर्चस्वाबद्दल समीक्षक आनंद यादव म्हणतात, ''बाह्य घटनांनी मूळ आशय आणि अनुभव नियंत्रित झाल्याने त्यांच्यावर अत्यंत जोरदार दडपणे येतात. त्याच्या मूळ स्वरूपात असलेले चैतन्य गमावते. हे चैतन्य गमावले की, कलावंताची मुक्तशीलताही लोप पावते आणि मग कला जाऊन कौशल्य उरते. मूळ अनुभवात असलेल्या व्यक्ती आपले स्वभाव सोडून देतात. बाहेरची आलेली दडपणे व बंधने हेच आपले स्वभाव असे त्यांना लेखकाच्या इच्छेखातर मान्य करावे लागते. त्यांचा शेवटही लेखक बाह्य दडपणानेच ठरवतो. त्यामुळे सारेच यांत्रिक, कृत्रिम आणि निर्जीव होऊन बसते.''७

असे जरी असले तरी पारंपरिक स्त्री--जीवनाला फाटा देऊन केवळ चूल आणि मूल यात रमणाऱ्या, होणारा अत्याचार बदनामीपोटी लपवून ठेवणाऱ्या भारतीय संस्कृतीतील स्त्री पेक्षा एक तडफदार स्त्री–जीवन चित्रित करण्यात दळवी थोड्याफार प्रमाणात का होईना यशस्वी झाल्याचे आढळते.

जयवंत दळवी यांनी आपल्या नाटकातून मध्यमवर्गीय लोकांचे जीवन रेखाटले असून बदलत्या समाजमनाची स्पंदने टिपण्यात ते यशस्वी झाल्याचे दिसते. वाढत्या औद्योगिकरणामुळे जीवनातील मूल्यसंकल्पनांवर होणारे आघात आणि लैंगिक आकर्षणापायी होणारे स्वैराचार यातून होणारी मानवी मनाची तडफड, तळमळ आणि या सर्वांचा परिणाम म्हणून लागणारे वेड, निर्माण होणारी विकृती, वार्धक्य आणि भूतकाळात रमणारी वस्ती या वर्तुळाभोवती दळवींनी आपले नाट्यविश्व गुंफल्याचे दिसते.

**संदर्भ**

१) वसंत कानेटकर, कस्तुरीमृग, पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९७६, पृ.क्र. ५

२) वसंत कानेटकर, कस्तुरीमृग, पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९७६,पृ.क्र. ५

३) माधव मनोहर, सोबत, २१ मार्च १९७६, पृ.क्र.२

४) जयवंत दळवी, राजस, नोव्हें१९८१, पृ.क्र.१

५) दळवी जयवंत, पुरूष, मॅजेस्टीक प्रकाशन मुंबई १९८३, पृ.क्र.१५

६) रसिक, दळवींनी मुलाखत, (नाटककार दळवी : एक दिलखुलास संवाद) देव वीणा, नोव्हेंबर १९८१, पृ.क्र.१

७) यादव आनंद, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि प्रेरणा, मेहता पब्लीशिंग हाऊस, पुणे १९७९

□□□



Scanned by CamScanner